पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/०३/कावि/१४०४/२०१७
दिनांक - १५/०९/२०१७

प्रति,

मा........................................,
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा दिनांक - १९/०९/२०१७ रोजी आयोजित केले बाबत....

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक १९/०९/२०१७ रोजी दुपारी ०२.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

कार्यपत्रिका क्रमांक – २७

दिनांक - १९/०९/२०१७ वेळ – दुपारी ०२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार दिनांक १९/०९/२०१७ रोजी दुपारी ०२.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

दिनांक ०६/०९/२०१७ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २५) चा सभावृत्तांत कायम करणे.

----------

विषय क्र.१) मनपाचे विविध विभागासाठी आवश्यक कागद साहित्य खरेदीकामी ई.नि.सु क्र. 12/2017-18 अन्वये लघुत्तम निविदाकार मे.ओके एंटरप्रायजेस, प्राधिकरण यांचे बाब क्र.01 व 2 साठी कागद साहित्य खरेदीकामी एकुण र.रु.17,28,000/- (अक्षरी र.रु.सतरा लाख अठ्ठावीस हजार फक्त) चे खर्चास मान्यता व त्यांचेबरोबर करारनामा करुन खरेदीस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दि.१९/०९/२०१७ रोजीचे सभेत घेणेचे निर्णया प्रमाणे)

विषय क्र.२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे नव्याने सुरु करणेत आलेल्या G व H क्षेत्रिय कार्यालयातील संगणक यंत्रणेकरीता आवश्यक नेटवर्कींग साहीत्य खरेदी करुन कार्यान्वीत करणेकामी निविदा सुचना क्रमांक ०९/२०१७-२०१८ अन्वये र.रु. ९.०८,१५३/- ची निविदा प्रसिध्द करुन निविदा दर मागविण्यात आले आहेत. त्यामधील लघुत्तम निविदाकार मे. मोनार्च टेक्नॉलॉजी, पुणे यांचे नेटवर्कींग साहीत्य पुरवठा करुन कार्यान्वीत करणेकामी एकुण र.रुपये ८,७४,८९३/- असे लघुत्तम दर प्राप्त झालेले आहेत. प्राप्त दर मा. अति.आयुक्त सो. व मा.मुलेप यांनी दिनांक २४/०८/२०१७ चे प्रस्तावान्वये स्विकृत केलेले आहेत. सबब लघुत्तम निविदाकार मे. मोनार्च टेक्नॉलॉजी, पुणे यांचे कडुन नव्याने सुरु करणेत आलेल्या G व H क्षेत्रिय कार्यालयातील नेटवर्कींग कामकाजासाठी आवश्यक साहीत्य पुरवठा करुन कार्यान्वीत करुन देणेकामी येणा-या एकुण र.रु.८,७४,८९३/- प्राप्त दर अंदाजपत्रकीय रक्कमेचे तुलनेत ३.६६ टक्केने कमी असल्याने याकामी त्यांचेशी करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

(दि.१९/०९/२०१७ रोजीचे सभेत घेणेचे निर्णया प्रमाणे)

विषय क्र.३) मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.24-2016/17 मधील अ.क्र. 02 अन्वये सन 2016/17 करीता क क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील कारंजे व धबधबे यांचे चालन व देखभाल दुरूस्ती करणेकामी मे. एन. सी. वाय. एन्टरप्रायझेस नि.र.रू.9,99,003/- (अक्षरी र.रू.नऊ लाख नव्व्यान्नो हजार तीन फक्त) पेक्षा 3.47% कमी या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

(दि.१९/०९/२०१७ रोजीचे सभेत घेणेचे निर्णया प्रमाणे)

विषय क्र.४) शिव शाहु संभाजी उद्यानच्या देखभालीचे कामकाज मे.अजित स्वंयरोजगार सेवा सहकारी संस्था यांना र.रु.63,016/- या दराने 3 वर्ष इतक्या कालावधीसाठी देणेत आलेले होते. त्याची मुदत संपलेनंतर निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत मान्य प्रस्तावानुसार मुदतवाढ देणेत आलेली असुन सदर वाढीव कालावधीस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास र.रु.12,00,000 /- (अक्षरी र.रू. बारा लाख फक्त) मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.५) भक्ती शक्ती उद्यानाच्या देखभालीचे कामकाज मे.अजित स्वंयरोजगार सेवा सहकारी संस्था यांना र.रु.30,647/- या दराने 3 वर्ष इतक्या कालावधीसाठी देणेत आलेले होते. त्याची मुदत संपलेनंतर निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत मान्य प्रस्तावानुसार मुदतवाढ देणेत आलेली असुन सदर वाढीव कालावधीस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास र.रु.5,00,000 /- (अक्षरी र.रू. पाच लाख फक्त) मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.६) विर सावरकर उद्यानाच्या देखभालीचे कामकाज मे.तावरे कन्स्ट्रक्शन कंपनी यांना र.रु.21,454/- या दराने 3 वर्ष इतक्या कालावधीसाठी देणेत आलेले होते. त्याची मुदत संपलेनंतर निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत मान्य प्रस्तावानुसार मुदतवाढ देणेत आलेली असुन सदर वाढीव कालावधीस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास र.रु.4,00,000/- (अक्षरी र.रू. चार लाख फक्त) मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.७) सर्पोद्यान व पक्षालय उद्यानाच्या देखभालीचे कामकाज मे.तावरे कन्स्ट्रक्शन कंपनी यांना र.रु.55,938/- या दराने 3 वर्ष इतक्या कालावधीसाठी देणेत आलेले होते. त्याची मुदत संपलेनंतर निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत मान्य प्रस्तावानुसार मुदतवाढ देणेत आलेली असुन सदर वाढीव कालावधीस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास र.रु.8,00,000 /- (अक्षरी र.रू.आठ लाख फक्त) मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.८) भोसरी सहल केंद्र उद्यानाच्या देखभालीचे कामकाज मे. तावरे कन्स्ट्रक्शन कंपनी यांना र.रु.2,82,109/- या दराने 3 वर्ष इतक्या कालावधीसाठी देणेत आलेले होते. त्याची मुदत संपलेनंतर निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत मान्य प्रस्तावानुसार मुदतवाढ देणेत आलेली असुन सदर वाढीव कालावधीस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास र.रु.37,00,000 /- (अक्षरी र.रू. सदतीस लाख फक्त) मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.९) सावतामाळी उद्यान जाधववाडीच्या देखभालीचे कामकाज मे. तावरे फॅसिलीटी मॅनेजमेंट सव्हिसेस यांना र.रु.20,852/- या दराने 2 वर्ष इतक्या कालावधीसाठी देणेत आलेले होते. त्याची मुदत संपलेनंतर निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत मान्य प्रस्तावानुसार मुदतवाढ देणेत आलेली असुन सदर वाढीव कालावधीस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास र.रु.3,75,000 /- (अक्षरी र.रू. तीन लाख पंचाहत्तर हजार फक्त) मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१०) Pcntda कडील नाला चॅनेलायझेशन मोकळ्या जागाच्या देखभालीचे कामकाज मे. बी.व्ही.जी इंडिया लि. यांना र.रु.6,79,562/- या दराने 2 वर्ष इतक्या कालावधीसाठी देणेत आलेले होते. त्याची मुदत संपलेनंतर निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत मान्य प्रस्तावानुसार मुदतवाढ देणेत आलेली असुन सदर वाढीव कालावधीस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास र.रु.48,00,000 /- (अक्षरी र.रू. अठ्ठेचाळीस लाख फक्त) मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.११) उद्योगनगर उद्यानाच्या देखभालीचे कामकाज मे. इंदिरा महिला विकास औद्यो. स्वय. सेवा संस्था यांना र.रु.20,491/- या दराने 3 वर्ष इतक्या कालावधीसाठी देणेत आलेले होते. त्याची मुदत संपलेनंतर निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत मान्य प्रस्तावानुसार मुदतवाढ देणेत आलेली असुन सदर वाढीव कालावधीस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास र.रु.2,50,000/ (अक्षरी र.रू. दोन लाख पन्नास हजार फक्त) मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१२) राजश्री शाहु उद्यानच्या देखभालीचे कामकाज मे.साईकृपा सर्व्हिसेस यांना र.रु. 84,029/- या दराने 3 वर्ष इतक्या कालावधीसाठी देणेत आलेले होते. त्याची मुदत संपलेनंतर निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत मान्य प्रस्तावानुसार मुदतवाढ देणेत आलेली असुन सदर वाढीव कालावधीस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास र.रु.10,00,000/ (अक्षरी र.रू. दहा लाख फक्त) मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१३) स्व.तानाजीराव शितोळे सरकार उद्यानाच्या देखभालीचे कामकाज मे.बी.व्ही.जी इंडिया लि. यांना र.रु.1,37,691/- या दराने 3 वर्ष इतक्या कालावधीसाठी देणेत आलेले होते. त्याची मुदत संपलेनंतर निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत मान्य प्रस्तावानुसार मुदतवाढ देणेत आलेली असुन सदर वाढीव कालावधीस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास र.रु.16,00,000/ (अक्षरी र.रू. सोळा लाख फक्त) मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१४) स्वा.विर सावरकर उद्यान गणेश तलावाच्या देखभालीचे कामकाज .बी.व्ही.जी इंडिया लि. यांना र.रु.3,59,893/- या दराने 3 वर्ष इतक्या कालावधीसाठी देणेत आलेले होते. त्याची मुदत संपलेनंतर निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत मान्य प्रस्तावानुसार मुदतवाढ देणेत आलेली असुन सदर वाढीव कालावधीस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास र.रु.40,00,000 /- (अक्षरी र.रू. चाळीस लाख फक्त) मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१५) वेताळ महाराज उद्यानाच्या देखभालीचे कामकाज मे. सावित्री महिला स्वयं. सेवा संस्था यांना र.रु.11,084/- या दराने 3 वर्ष इतक्या कालावधीसाठी देणेत आलेले होते. त्याची मुदत संपलेनंतर निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत मान्य प्रस्तावानुसार मुदतवाढ देणेत आलेली असुन सदर वाढीव कालावधीस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास र.रु.1,20,000/- (अक्षरी र.रू. एक लाख वीस हजार फक्त) मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१६) रावेत उद्यानाच्या देखभालीचे कामकाज मे. धर्मराज स्वय. सेवा संस्था यांना र.रु.19,201/- या दराने 3 वर्ष इतक्या कालावधीसाठी देणेत आलेले होते. त्याची मुदत संपलेनंतर निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत मान्य प्रस्तावानुसार मुदतवाढ देणेत आलेली असुन सदर वाढीव कालावधीस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास र.रु.1,60,000/- मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१७) सदगुरु दत्त उद्यानच्या देखभालीचे कामकाज मे.जनसेवा सह.सेवा.संस्था यांना र.रु.12,648/- या दराने 1 वर्ष इतक्या कालावधीसाठी देणेत आलेले होते. त्याची मुदत संपलेनंतर निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत मान्य प्रस्तावानुसार मुदतवाढ देणेत आलेली असुन सदर वाढीव कालावधीस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास र.रु.1,50,000/- (अक्षरी र.रू. एक लाख पन्नास हजार फक्त) मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१८) सावित्रीबाई फुले, तानाजी गावडे, व्यायामशाळा, गणेशबाग उद्यानाच्या देखभालीचे कामकाज मे. अजित स्वय.सेवा सह. संस्था यांना र.रु.12,152/- या दराने 11 महिने इतक्या कालावधीसाठी देणेत आलेले होते. त्याची मुदत संपलेनंतर

निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत मान्य प्रस्तावानुसार मुदतवाढ देणेत आलेली असुन सदर वाढीव कालावधीस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास र.रु.3,00,000 /- (अक्षरी र.रू. तीन लाख फक्त) मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१९) मुक्ताई उद्यानाच्या देखभालीचे कामकाज मे. मंगलमुर्ती स्वय.सेवा संस्था यांना र.रु.25,650/- या दराने 3 वर्ष इतक्या कालावधीसाठी देणेत आलेले होते. त्याची मुदत संपलेनंतर निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत मान्य प्रस्तावानुसार मुदतवाढ देणेत आलेली असुन सदर वाढीव कालावधीस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास र.रु.2,50,000/- (अक्षरी र.रू. दोन लाख पन्नास हजार फक्त) मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२०) मनपाची विविध उद्याने देखभाल करणेच्या देखभालीचे कामकाज मे. तावरे कन्स्ट्रक्शन यांना र.रु.5,82,833/- या दराने 2 वर्ष इतक्या कालावधीसाठी देणेत आलेले होते. त्याची मुदत संपलेनंतर निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत मान्य प्रस्तावानुसार मुदतवाढ देणेत आलेली असुन सदर वाढीव कालावधीस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास र.रु.30,00,000/- (अक्षरी र.रू. तीस लाख फक्त) मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२१) सिल्व्हर गार्डनच्या देखभालीचे कामकाज बिजलीनगर युवा प्रतिष्ठान यांना र.रु.14,022/- या दराने 3 वर्ष इतक्या कालावधीसाठी देणेत आलेले होते. त्याची मुदत संपलेनंतर निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत मान्य प्रस्तावानुसार मुदतवाढ देणेत आलेली असुन सदर वाढीव कालावधीस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास र.रु.1,50,000/- (अक्षरी र.रू.एक लाख पन्नास हजार फक्त) मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२२) मिनाताई ठाकरे जलतरण तलाव नाना नानी उद्यानाच्या देखभालीचे कामकाज मे. अथर्व स्वंयरोजगार औद्योगिक सेवा सह मर्या यांना र.रु.14,774/- या दराने 3 वर्ष इतक्या कालावधीसाठी देणेत आलेले होते. त्याची मुदत संपलेनंतर निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत मान्य प्रस्तावानुसार मुदतवाढ देणेत आलेली असुन सदर वाढीव कालावधीस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास र.रु.1,80,000/- (अक्षरी र.रू. एक लाख ऐंशी हजार फक्त) मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२३) छ.शिवाजी महाराज उद्यान (मधुबन सोसायटी)च्या देखभालीचे कामकाज मे. कल्याण स्वंयरोजगार सेवा सहकारी संस्था यांना र.रु.41,040/- या दराने 11 महिने इतक्या कालावधीसाठी देणेत आलेले होते. त्याची मुदत संपलेनंतर निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत मान्य प्रस्तावानुसार मुदतवाढ देणेत आलेली असुन सदर वाढीव कालावधीस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास र.रु.3,50,000/- मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२४) सिताराम भागुजी लोंढे उद्यानच्या देखभालीचे कामकाज मे. तुळजाभवानी सर्व्हिसेस यांना र.रु.39,839/- या दराने 3 वर्ष इतक्या कालावधीसाठी देणेत आलेले होते. त्याची मुदत संपलेनंतर निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत मान्य प्रस्तावानुसार मुदतवाढ देणेत आलेली असुन सदर वाढीव कालावधीस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास र.रु.3,00,000 /- मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२५) पुणे मंबई हमहरस्ता सुशोभिकरण निगडी ते दापोडीच्या देखभालीचे कामकाज मे.बि.व्ही. इंडीया ली. मी यांना र.रु.3,20,284/- या दराने 1 वर्ष इतक्या कालावधीसाठी देणेत आलेले होते. त्याची मुदत संपलेनंतर निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत मान्य प्रस्तावानुसार मुदतवाढ देणेत आलेली असुन सदर वाढीव कालावधीस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास र.रु.25,00,000/- मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२६) मनपाचे चिखली मैलाशुध्दीकरण केंद्र उद्यान देखभाल विकास व संरक्षण कामाबाबतच्या देखभालीचे कामकाज मे. स्वामी विवेकानंद महिला स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादि यांना र.रु.30,907/- या दराने 2 वर्ष इतक्या कालावधीसाठी देणेत आलेले होते. त्याची मुदत संपलेनंतर निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत मान्य प्रस्तावानुसार मुदतवाढ देणेत आलेली असुन सदर वाढीव कालावधीस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास र.रु.4,000,00/- मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२७) मनपाचे तळवडे पॉलिहाऊस उद्यान देखभाल व संरक्षणच्या देखभालीचे कामकाज मे. एस.के.बापु युवा फौंडेशन यांना र.रु.43,904/- या दराने 11 महिने इतक्या कालावधीसाठी देणेत आलेले होते. त्याची मुदत संपलेनंतर निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत मान्य प्रस्तावानुसार मुदतवाढ देणेत आलेली असुन सदर वाढीव कालावधीस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास र.रु.80,000 /- मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२८) पिंपरी चिंचवड महानगरपालिके मध्ये आर.सी.एच कार्यक्रमांतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांना शासन आदेशानुसार व मा.आयुक्त (कु.क.) व संचालक राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान मुंबई यांचेकडील परिपत्रक क्र.राआसो/आस्था/मानधनवाढ(२०१५-१६)/५१९३१-५२३२८/१५ दि.७/११/१५ अन्वये प्रस्तावात नमूद प्रमाणे सद्यस्थीतीत देत असलेल्या मानधनावर ५ टक्के मानधवाढ दरवर्षी माहे जुलै मध्ये करणेस व प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२९) मिळकतकर थकबाकीवर आकारणेत आलेल्या मनपा कर शास्तीमध्ये थकबाकीसह मिळकतकराची संपुर्ण रक्कम एक रक्कमी भरणा करणा-या मिळकतधारकांकरिता सवलत/ माफी देणेकामीची अभय योजना खालील प्रमाणे.

| अ. क्र. | थकबाकीसह संपूर्ण मिकतकराची रक्कम भरणेकामी कालावधी | मनपा कर शास्तीमध्ये देणेची माफी/ सवलत टक्केवारी |
|---|---|---|
| १. | दिनांक १ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर २०१७ अखेर | भरणा दिनांका पर्यंत आकारणेत आलेल्या मनपा शास्ती रकमेचे ७५ टक्के |
| २. | दिनांक १ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर २०१७ अखेर | भरणा दिनांका पर्यंत आकारणेत आलेल्या मनपा शास्ती रकमेचे ५० टक्के |

उक्त नमूद प्रमाणे अभय योजना राबविणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३०) केंद्र शासनाने “स्वच्छ भारत अभियान” दिनांक 02/10/2014 पासून घोषित केले असून दिनांक 02/10/2014 ते दिनांक 02/10/2019 या कालावधीत अभियान राबविण्यात येत आहे. या अभियाना अंतर्गत शहरे हागणदारी मुक्त करणे व घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत शहरे स्वच्छ करणे या दोन प्रमुख बाबींचा समावेश आहे. केंद्र शासनाच्या “स्वच्छ भारत अभियान (नागरी)” च्या धर्तीवर दिनांक 15/05/2015 च्या शासन निर्णयान्वये राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियानची (नागरी) अंमलबजावणी सुरू आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत शहरात स्वयंसेवी संस्था, सहकारी गृह रचना संस्था,नागरिक यांचे सहकार्याने स्वच्छ भारत अभियान राबविण्यात येत आहे. स्वच्छ भारत अभियानाचा जास्तीत जास्त प्रसार होऊन नागरिकांचा त्यामध्ये समावेश वाढण्याच्या दृष्टीने शहरातील गृहप्रकल्पांमध्ये पर्यावरण पूरक व स्वच्छता विषयक स्पर्धा झाल्यास शहर पर्यावरण पूरक व स्वच्छ होणेस मदत होईल, पर्यायाने कचरा वाहतूक व विल्हेवाट करण्यासाठी महानगरपालिकेवर व इतर शासकीय यंत्रणांवर पडणारा अतिरिक्त ताण काही प्रमाणात कमी होण्यास मदत होईल.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 140-अ मध्ये मालमत्ता कराची रक्कम आगाऊ भरल्यास व 140-ब मध्ये परिस्थितीकीयदृष्ट्या लाभदायक योजनेची अंमलबजावणी करणेकरिता करात सूट देणेची तरतूद आहे. “आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी” बक्षीस योजना राबविणेकामी खालीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

1. “आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी” बक्षीस योजना खालीलप्रमाणे 02 गटामध्ये स्पर्धा घेणे.

| | |
|---|---|
| गट १-१२ ते १०० फ्लॅट/बंगलो/ रो हाऊस असलेली सोसायटी | क्षेत्रिय कार्यालयनिहाय १ या प्रमाणे ८ क्षेत्रिय कार्यालयातून ८ सोसायट्यांची निवड |
| गट २-१०० चे पुढील फ्लॅट/बंगलो/रो हाऊस असलेली सोसायटी | क्षेत्रिय कार्यालयनिहाय १ या प्रमाणे ८ क्षेत्रिय कार्यालयातून ८ सोसायट्यांची निवड |

2. आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी स्पर्धेकरिता मा. आयुक्त यांचे मान्यतेने स्पर्धेमध्ये सहभाग घेणेकामीचा अर्ज व तपासणीकामीचे निकष तयार करणे.

3. स्पर्धेमध्ये भाग घेणा-या आदर्श पर्यावर संतुलित सोसायटीने 100% पाणीपट्टी व सोसायटी मधील मिळकतधारकांनी 90% मिळकतकराचा भरणा करणे अनिवार्य राहील.

4. आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी स्पर्धेत सहभागी होणेकामी सोसायटी / गृह प्रकल्पांचे क्षेत्रिय कार्यालय स्तरावर अर्ज स्विकारुन निश्चित केलेल्या निकषांनुसार तपासणी करणेकामी प्रत्येक क्षेत्रिय कार्यालयाकरिता 1. दोन मनपा अधिकारी 2. एक अशासकीय संस्थेचा प्रतिनिधी 3. एक पत्रकार, यांचा समावेश असलेले तपासणी पथकांची नेमणूक करणे.

5. आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी बक्षीस योजना अंमलबजावणीचे मुख्य निकष व गुण खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | मुख्य निकष | गुणांक |
|---|---|---|
| १. | इमारत व इमारतीचे परिसरामध्ये १००% कचरा वर्गीकरण व प्रक्रिया | ३० |
| २. | पाणी संवर्धन, पाणी पुनर्चक्रण, पाणी पुनर्वापर | २० |
| ३. | सौर उर्जा प्रकल्प, एल.ई.डी. दिव्यांचा वापर | १५ |
| ४. | वृक्षारोपण आणि संवर्धन, लॅण्ड स्केपिंग | २० |
| ५. | पर्यावरण पूरक नाविन्यपूर्ण उपक्रम | १५ |
| | एकूण | १०० |

6. आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी तपासणीमध्ये प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारे स्टार रेटींगनुसार सामान्य करात देण्याचे सवलतीची टक्केवारी

| अ.क्र. | गुण तपशील | रेटींग | सामान्य करात सवलत |
|---|---|---|---|
| १. | ८६ ते १०० गुण | ***** | १५% |
| २. | ७६ ते ८५ गुण | **** | १०% |
| ३. | ६६ ते ७५ गुण | *** | ५% |
| ४. | ५१ ते ६५ गुण | ** | प्रमाणपत्र |

7. महापालिकेच्या प्रत्येक क्षेत्रिय कार्यालयनिहाय गट क्रमांक 1 व गट क्रमांक 2 करिता प्रत्येकी एक आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटीची निवड करणे.

8. आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी स्पर्धेतील विजेत्या सोसायटींमधील मिळकतींना महापालिकेमार्फत सध्या सामान्य करातील देण्यात येणा-या सवलतीं व्यतिरिक्त स्टार रेटींगनुसार सामान्य करात सवलत देणे.

9. तपासणी केलेल्या आर्थिक वर्षाचे पुढील आर्थिक वर्षात दिनांक 30 जून अखेर थकबाकीसह संपूर्ण बिलाची एक रक्कमी रक्कम भरणा करणा-या मिळकती सवलतीच्या लाभास पात्र राहतील.

10. आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी बक्षीस योजना सन 2017 - 2018 ते 2019 -2020 या कालावधीत 3 वर्षे राबविण्यात येईल.

तरी “आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी” बक्षीस योजना राबवून निवड झालेल्या सोसायटींमधील मिळकतींना महापालिकेमार्फत सध्या सामान्य करातील देण्यात येणा-या सवलतीं व्यतिरिक्त स्टार रेटींगनुसार सामान्य करात सवलत देणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क क्षेत्रीय कार्यालय हद्दीत विठ्ठलनगर पुनर्वसन प्रकल्पातील दोन इमारतीचे परिसराची व त्या इमारती मधील २२४ प्लॅटचे साफसफाईबाबत.. कोटेशन र.रू.:-१,३०,०००/- साहित्याचा पुरवठा – तातडीने श्री.संत गाडगेबाबा महाराज बेरोजगार संस्था यांनी ३ दिवसासाठी र.रू.१,३०,०००/- मध्ये साफसफाई करणेस इच्छुक आहे. हा दर सर्व करासह इतर कमी दर असल्याने तो स्विकृत करणेत आलेला आहे. मा. आयुक्त साहेब यांनी दि.२१/०७/२०१७ रोजीचे प्रस्तावान्वये मान्यता दिलेली आहे.त्यानुसार श्री.संत गाडगेबाबा महाराज बेरोजगार संस्था यांचेकडून कोटेशन मंजूर दराने र.रू.१,३०,०००/- पर्यत काम करून घेण्यात आले असून त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.३२) मे.ओमेगा इलेव्हेटर्स, पुणे यांस दि.०१-०९-२०१७ ते दि.३१-०८-२०१८ या कालावधीमध्ये भोसरी येथील कै.अंकुशराव लांडगे नाट्यगृहामधील उद्वाहक क्र. १ व २ चे वार्षीक पद्धतीने देखभाल व दुरुस्ती करणे करीता (AMC) थेटपद्धतीने परंतु रितसर करारनामा करुन करणेकामी आगाऊ र.रु.१,९४,७००/- (जी.एस.टी.सह) (अक्षरी र.रु.एक लाख चौ-यान्नव हजार सातशे फक्त) अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३३) पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील नि.नो.क्र.Env/०५/२०१६-१७ मधील मोशी कचरा डेपो येथे दररोज येणा-या कच-यावर बायोलॉजीकल ओडरकंट्रोलर प्रक्रिया करणे करिता दुर्गन्धीनाशक पुरवणे व फवारणेकामी मे.जी केमिकल वर्क्स निविदा नि.र.रु.२४,९५,५१५/- (अक्षरी र.रू.चौवीस लाख पंच्यान्नव हजार पाचशे पंधरा फक्त) पेक्षा -३.२०% कमी (सुधारित दरपृथ्थ:करणाद्वारे) या दराने करुन कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.३४) कै.अंकुशराव लांडगे प्रेक्षागृह येथुन विविध विकास प्रकल्पांचे ई-भुमिपुजन व उद्घाटन मा.देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे हस्ते करणे या कार्यक्रमासाठी करणेत आलेल्या विद्युत विषयक कामे, स्पिकर, माईक, एल.ई.डी.स्क्रीन व जनरेटर व्यवस्था करणे याकामी वापरात आलेल्या बाबींचे अंदाजपत्रक तयार केले असता त्यानुसार र.रु.१,९९,६५७/- इतका खर्च झाला आहे. सदर काम मे.त्रिमुर्ती मंडप स्पिकर अन्ड इल्क्ट्रीकल्स, निगडी यांजकडुन सध्याचे चालु/पुर्ण निविदा स्विकृत दराने (नि.क्र.३/३२-१६/१७, ०.९% कमी) करारनामा न करता थेट पद्धतीने करुन घेणेकामी व याकामी झालेल्या खर्चाची अदायगी मे.त्रिमुर्ती मंडप स्पिकर अन्ड इलेक्ट्रीकल्स, निगडी यास रक्कम रुपये १,९७,८६०/- (अक्षरी र.रु.एक लाख सत्तायन्नव हजार आठशे साठ फक्त) करारनामा न करता अदा करणेस कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३५) प्रभाग क्र.३ मधील विकास आराखड्यातीलविविध डि.पी रस्ते तसेच सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकात समावेश केलेल्या डि.पी. रस्त्यांचा नियोजनबद्ध विकास करणेसाठी सल्लागार नेमण्यास मा.आयुक्त यांनी दि.०८/०९/२०१७ च्या मंजूर प्रस्तावानुसार मान्यता दिलेली आहे. महानगरपालिकेच्या विकास आराखड्यानुसार डि.पी. रस्त्यामधील विविध सेवा वाहिन्या यांत मध्ये प्रामुख्याने पाणीपुरवठा, जलनि:सारण, विद्युत, दुरसंचार, म.रा.वि.वि.कं. यांचेसह महानगरपालिकेच्या सर्व आवश्यक विभागांचे एकत्रित नियोजित

मागणीनुसार डि.पी. रस्ता विकसीत करणे व स्थापत्य विषयक कामांच्या बाबींचे पुर्वगणपत्रक तयार करणे व निविदा बनविणेसह कामाची देखरेख करणे, इ. निविदा पुर्व (Pre Tender Activity) व निविदा पश्चात (Post Tender Activity) कामे करावी लागणार आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या उपरोक्त संबंधित अशा विविध प्रकल्पांसाठी सल्लागार मे.विकास इंडिया कंन्सलटींग प्रा.लि. पुणे यांची सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आलेली कामे प्रगतीपथावर आहेत. या बाबींचा विचार करीता उपरोक्त विषयकामी प्रभाग क्र. ३ मधील विकासकामांसाठी मे.विकास इंडिया कंन्सलटींग प्रा.लि पुणे यांची सल्लागार म्हणून नेमणूक करून मनपाच्या प्रचलित दरानुसार निविदा पुर्व (Pre Tender Activity) व निविदा पश्चात (Post Tender Activity) साठी स्विकृत निविदा किंमतीच्या (Pre Tender Activity) ०.७५%व निविदा पश्चात (Post Tender Activity) साठी १.००% फी अधिक सेवाकर (Service Tax) इ. याप्रमाणे देय निश्चित करून विषयांकित कामासाठी मे.विकास इंडिया कंन्सलटींग प्रा.लि पुणे यांची नेमणुक करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३६) महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२१.०८.२०१७ ते दि.२७.०८.२०१७ अखेर संपणा-या आठवड्याचा मा.मुख्य लेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/१४३/२०१७ दि.१३.०९.२०१७ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणे.

विषय क्र.३७) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.६८/०१/२०१६-१७ मधील काम क्र.१ अन्वये, प्र.क्र.२० चिंचवडे नगर शाहू उद्यानात शिवसृष्टी विकसित करणेकामी मे.पी.एन.नागणे निवीदा र.रु.१,७५,०७,७६७/- (अक्षरी एक कोटी, पंच्चाहत्तर लाख, सात हजार, सातशे सदुसष्ट फक्त) पेक्षा ११.५०% कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.१,५४,९४,३७४/- पर्यत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३८) मा.क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक ५० दिनांक ०८/०९/२०१७ नुसार चिंचवड मधील वाल्हेकरवाडी व्यायामशाळा दरमहा र.रु.२,०००/- सेवाशुल्क तत्वावर व मनपा नियमानुसार तीन वर्षे

कालावधीकरिता गुरुदेवनगर मित्रमंडळ, आकुर्डी या मंडळास चालविण्यास देण्यात यावी. गुरुदेवनगर मित्र मंडळ, आकुर्डी या मंडळाचा रजिस्टर नंबर महा १४९९/१३ हा आहे. गुरुदेवनगर मित्र मंडळाचे काम अतिशय चांगल्या पध्दतीचे आहे. तरी सदरची व्यायामशाळा गुरुदेवनगर मित्र मंडळ, आकुर्डी यांना सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३९) मा.क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक ५१ दिनांक ०८/०९/२०१७ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विद्यानिकेतन प्राथमिक शाळेजवळील नवमहाराष्ट्र व्यायामशाळा “मैत्री स्वयंरोजगार सेवा संस्था, पिंपरीगाव” या संस्थेस ११ महिने कराराने दरमहा र.रु.२,०००/- सेवाशुल्क मनपाकडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.४०) मा.क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक ५२ दिनांक ०८/०९/२०१७ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कै. दशरथ नामदेव कापसे, पिंपरीगाव व्यायामशाळा, त्यावरील रिक्त सभागृह “मैत्री स्वयंरोजगार सेवा संस्था, पिंपरीगाव” या संस्थेस ११ महिने कराराने दरमहा र.रु.२,०००/- सेवाशुल्क मनपाकडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.४१) मा.क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक ५३ दिनांक ०८/०९/२०१७ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने, भारतीय कुस्ती संघटना यांच्या मान्यतेने माहे ऑक्टोबर २०१७ मध्ये मोशी येथे महापौर चषक आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धा २०१७-१८ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.४२) मा.क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक ५४ दिनांक ०८/०९/२०१७ नुसार खिंवसरा पाटील व्यायामशाळेमध्ये थेरगाव, वाकड तसेच मावळ, मुळशी परिसरातील ४० ते ४५ पैलवान नियमित सराव करीत असतात. सर्व पैलवान कुस्तीचा सराव याच मातीच्या हौदात नियमितपणे करतात. त्यामुळे ही माती सराव करण्यासाठी योग्य प्रतीची व आरोग्यदायक असणे आवश्यक आहे. परंतु बरेच वर्षापासून या मातीला खाद्य मिळालेले नाही. तसेच या हौदातील मातीची मशागत देखील करण्यात आलेली नाही. तरी लवकरात लवकर सदर तालीमीमध्ये मातीला खाद्य व मशागतीसाठी र.रु.४५,०००/- (अक्षरी र.रु.पंचेचाळीस हजार फक्त) किंवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.४३) मा.क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक ४८ दिनांक २८/०८/२०१७ व मा.क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक ५५ दिनांक ०८/०९/२०१७ नुसार से.२८, निगडी मधील कै.संजय काळे हेल्थ क्लब ही व्यायामशाळा दरमहा र.रु.२,०००/- सेवाशुल्क तत्वावर व मनपा नियमानुसार पाच वर्षे कालावधीकरीता एकविरा सेवा संघ, चिंचवड या संस्थेस चालविण्या करिता देण्यात यावी. एकविरा सेवा संघ, चिंचवड या संस्थेचा रजिस्टर नंबर महा १८५७/२०१२ हा आहे. एकविरा सेवा संघ, चिंचवड या संस्थेचे काम अतिशय चांगल्या पध्दतीचे आहे. तरी सदरची व्यायामशाळा एकविरा सेवा संघ, चिंचवड यांना सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.४४)ब क्षेत्रिय कार्यालयामधील सन २००५ ते २००८ या वित्तिय वर्षात लेखाशिर्षावर अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा जादा खर्च झालेल्या डि.ओ.सी.क्र.२०१५ आक्षेप क्र.९६ एकूण र.रु.४७,०३,३१५/- व आक्षेप क्र.४४ एकूण र.रु.८,७६०/- चे खर्चास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील नियम १०३ शेड्यूल चाप्टर ७ नुसार व मा. मुख्यलेखापाल यांचेकडील परिपत्रक क्र. लेखा/आपु/कावि/१७/२०११ दि.२३/८/२०११ नुसार लेखाशिर्षावर अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा जादा झालेल्या खर्चास सक्षम समितीची मान्यता घेणे आवश्यक असल्याने प्रस्तावात नमूद प्रमाणे जादा झालेल्या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.४५)प्रस्तावात नमूद प्रमाणे प्रभाग क्र.४ कृष्णानगर येथे शरदनगर, शिवाजी पार्कला जोडणारा स्पाईन रस्त्यावर पादचारी भुयारी मार्ग बांधणेचे कामासाठी मे. सी. व्ही. कांड कंन्सलटंट प्रा. ली. यांची सल्लागार म्हणून नेमणूक करून मनपाच्या प्रचलीत दरानुसार व मा. आयुक्त सो यांचे दिनांक १०/८/२०१७ रोजीचे मंजुर प्रस्तावीत दरांप्रमाणे निविदा पुर्व (Pre Tender Activity) १% व निविदा पश्चात (Post Tender Activity) साठी १.७५% असे एकूण २.७५% सर्व करांसहीत देय्य फी निश्चीत करून विषयांकीत कामासाठी नेमणूक करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.४६) प्रस्तावात नमूद प्रमाणे प्रभाग क्र. २४ थेरगाव येथे डी.पी. आरक्षण क्र. ६२८ येथील खेळाचे मैदान विकसीत करणे या प्रकल्पासाठी मे. शिल्पी आर्किटेक्ट यांची सदर कामाचा पुर्वानुभव लक्षात घेता वास्तुविशारद सल्लागार (Architect) व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (P.M.C.) म्हणून नेमणूक करणेस व प्रकल्प तांत्रीक दृष्ट्या व यशस्वीपणे पुर्ण होणेकामी त्यांना

याकरिता मनपाचे प्रचलित दरानुसार निविदापुर्व कामासाठी लघुत्तम निविदा दराच्या २.००% सर्व करांसहित निविदा पश्चात कामासाठी लघुत्तम निविदा दराचे १.३५% (सर्व करांसहित) अशा प्रकारे फी अदायगी करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.४७) मनपाच्या विविध संगणक प्रणालित वस्तु व सेवा कराच्या अनुशंगाने बदल करणे व त्यांचे इंटिग्रेशन करणे व ई-निविदा संगणक प्राणाली मध्ये दुरुस्तीकरणे साठी विविध विभागांच्या संगणक प्रणालीमधिल करावयाच्या बदलांची निकड (वस्तु व सेवा कराच्या अंमलबजावणी मुळे) व तातडीची बाब विचारात घेता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ अनुसुची प्रकरण ५ नियम २ (२) चे नुसार निविदा प्रसिद्ध न करता थेट पद्धतीने परंतू करारनामा करून मे.प्रोबिटी सॉफ्ट प्रा.लि., पुणे यांचेमार्फत ई-गव्हर्नन्स प्रकल्पांच्या संगणक प्रणाली मधिल बदल करणे बाबतचे कामकाज करून घेणेस येणा-या र.रू.३२,८२,५००/- (अक्षरी र.रू. बत्तीस लाख ब्याऐंशी हजार पाचशे फक्त) अधिक कर व त्या अनुषंगाने येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/०३/कावि/१४०४/२०१७
दिनांक - १५/०९/२०१७

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.